दैनिक सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे



महाराष्ट्र दिवस
महाराष्ट्र दिनाच्या आणि कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १७७ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार, दि.१ मे २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# देशात जातीनिहाय जनगणना करण्याचा मोदी सरकारचा निर्णय



## केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत शिक्कामोर्तब

**दिल्ली (वृत्तसंस्था):** देशात जातीय जनगणना करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आज (मंगळवार, ३० एप्रिल) झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.आगामी जनगणेत जातीय जनगणना होणार असल्याची माहिती केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.जातीय जनगणना करण्याची मागणी गेल्या काही वर्षांपासून सातत्यानं करण्यात येत होती. ती मागणी केंद्र सरकारनं अखेर मान्य केली आहे. यावर्षी होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या निर्णयाला मोठं महत्त्व आहे.

बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वीचा मास्टर स्ट्रोक म्हणून हा या निर्णयाकडं पाहिलं जात आहे. बिहारमध्ये महागठबंधन सरकार असताना नितीशकुमार कॅबिनेटनं जातीय सर्वेक्षण केले होते. त्यानंतर देशभर याची अमंलबजावणी करण्याची मागणी करण्यात येत होती.सामाजिक जडणघडण आणि राज्य घटनेतील स्पष्ट व्यवस्था लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

### काँग्रेसनं केला होता विरोध

जातीय जनगणेनाला यापूर्वी काँग्रेसनं विरोध केला होता, असं वैष्णव यांनी सांगितलं. १९४७ नंतर आजवर ही जनगणा झालेली नाही. २०१० साली तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी जातीय जनगणना करण्याचं आश्वासन दिलं होतं. काँग्रेसनं नेहमीच व्होट बँकेसाठी याचा वापर केल्याचा आरोप वैष्णव यांनी केला.

---

देशी गायी 'राज्यमाता' असताना गोमांसाची तस्करी सुरुच

# लोकलमधून गोमांस वाहतूक प्रकरणात तिघांना अटक

## बदलापूर ते मुंब्रा प्रवासादरम्यान उग्र वासामुळे प्रवाशांनी उघडकीस आणले प्रकरण



**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने देशी गायींना 'राज्यमाता-गोमाता' म्हणून गौरविले असतानाही राज्यात गोमांसाची तस्करी सुरुच असून, बदलापूर येथून लोकल ट्रेनने गोमांस वाहतूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी तिघांना लोहमार्ग पोलिसांनी अटक केली असून, त्यांच्याकडून सुमारे १८ किलो गोमांस जप्त करण्यात आले आहे.ही घटना बदलापूर येथून सकाळी १०.२६ वाजता सुटणाऱ्या लोकलमध्ये घडली. या लोकलमध्ये प्रवास करणाऱ्या मनोज गौड आणि त्यांच्या मित्रांना उग्र वास जाणवल्याने त्यांनी एका प्रवाशाकडे पिशवीतील वस्तूंबाबत विचारणा केली. त्या पिशवीमध्ये मांस असल्याचा संशय आल्याने त्यांनी तात्काळ कल्याण स्थानकात तिघांना खाली उतरवून लोहमार्ग पोलिसांकडे सोपवले. पोलिस निरीक्षक लक्ष्मण चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेले आरोपी जमाल शेख, रफिक शेख आणि वाजीद शेख हे तिघेही मुंब्रा येथील रहिवासी आहेत. त्यांनी बदलापूर गावातून गोमांस विकत घेतल्याचे कबूल केले असून, ते मुंब्राकडे नेत असल्याची माहिती समोर आली आहे.या प्रकरणी कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोमांसाचे नमुने तपासासाठी पाठवण्यात आले असून उर्वरित मांस नष्ट करण्यात आल्याचेही चव्हाण यांनी सांगितले.ही घटना समोर आल्यानंतर गोमांस विक्री आणि वाहतुकीविषयी कठोर कारवाईची मागणी पुन्हा एकदा जोर धरत आहे.

---

२६/११ हल्ल्याच्या तपासाचे केले होते नेतृत्व

# मुंबईचे विशेष पोलिस आयुक्त देवेन भारती यांची मुंबईच्या पोलीस आयुक्तपदी नियुक्ती

## शहरातील कायदा सुव्यवस्थेचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर उभे आहे

**मुंबई । विराम पवार**

मुंबईचे विशेष पोलिस आयुक्त देवेन भारती यांची मुंबईच्या पोलीस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. आज, ३० एप्रिल रोजी मुंबईचे विद्यमान पोलीस आयुक्त विवेक फणसळकर निवृत्त झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.



भारती हे १९९४ बॅचचे आयपीएस अधिकारी असून, गुन्हे शाखा, दहशतवाद विरोधी पथक आणि महत्त्वाच्या तपासांमध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

मुंबई पोलीस आयुक्तपदासाठी देवेन भारती यांच्यासह सदानंद दाते, संजयकुमार वर्मा, रितेश कुमार आणि अर्चना त्यागी यांची नावे चर्चेत होती. मात्र शेवटी देवेन भारती यांच्याकडे या पदाची धुरा सोपवण्यात आली. विवेक फणसळकर यांनी ३० जून २०२२ रोजी आयुक्तपदाची जबाबदारी स्वीकारली होती.

देवेन भारती यांनी मुंबईतील सर्व पोलीस ठाण्यांवर नियंत्रण ठेवणाऱ्या संयुक्त पोलीस आयुक्त पदाची जबाबदारी पार पाडली आहे. तसेच, त्यांनी एटीएसचे प्रमुख, अतिरिक्त पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) अशा अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. २६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याच्या तपासातही त्यांचा सक्रिय सहभाग होता.

मिड डे पत्रकार जे. डे यांच्या हत्येप्रकरणाचा तपासही त्यांनी केला होता. राजकीय दृष्टिकोनातून पाहता, भारती हे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय मानले जातात. २०१४ ते २०१९ या कालावधीत त्यांनी महत्त्वाच्या पदांवर कार्य केले. मात्र, ऑक्टोबर २०२० मध्ये महाविकास आघाडी सरकारने त्यांची बदली महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळात केली होती.गुन्हेगार विजय पलांडेने देवेन भारती यांचे कथित संबंध दाऊद इब्राहिमशी संबंधित गुन्हेगारांशी असल्याचा आरोप केला होता. या प्रकरणात तत्कालीन पोलीस महासंचालक संजय पांडे यांनी चौकशी अहवाल सादर केला होता. मात्र, नोव्हेंबर २०२२ मध्ये सत्तेवर आलेल्या शिंदे-फडणवीस सरकारने हा अहवाल फेटाळून लावला.मुंबई पोलीस दलात अनुभवसंपन्न आणि खमके अधिकारी म्हणून ओळखले जाणारे देवेन भारती आता आयुक्तपदाची सूत्रे हातात घेत असून, त्यांच्या पुढे शहरातील कायदा-सुव्यवस्थेचे मोठे आव्हान असणार आहे.

---

# अवैध गुटखा वाहतूक करणारा कार सह ताब्यात; दोघांवर गुन्हा दाखल

## साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त



**परभणी । प्रतिनिधी**

जिल्ह्यात अवैध गुटखा वाहतुकीवर मोठी कारवाई करत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एक कार ताब्यात घेतली असून, सुमारे चार लाख चोवीस हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत मिळालेल्या गुप्त माहितीवरून स्था.गु.शा.चे पोनि विवेकानंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली पथकाने सोमवार, २९ एप्रिल रोजी पांढरी (ता. जिंतूर) येथे छापा टाकून ही कारवाई केली.

आरोपी आकाश भगवान वानरे (वय २५, रा. बाजार चौकी, हट्टा, ता. वसमत, जि. हिंगोली) हा स्विफ्ट डिझायर कार (MH46 Z 7603) मधून प्रतिबंधित गुटखा वाहतूक करताना आढळून आला. कार आणि गुटख्यासह एकूण ४,२४,९०२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त केलेल्या गुटख्यामध्ये 'राजनिवास कंपनीचा गुटखा', "V-1 तंबाखू', 'प्रिमियम ZL-01 जाफरानी जर्दा', 'केसर युक्त गोवा १०००' अशा प्रकारांचा समावेश आहे. आरोपीस ताब्यात घेऊन ताडकळस पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले.या प्रकरणी संबंधित दोघांविरोधात कलम १२३, २२३, २७४, २७५, ३(५) भादंवि २०२३ तसेच कलम ५९ अन्नसुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोनि विवेकानंद पाटील, पोउपनि चंदनसिंग परिहार, पो.अं. रंगनाथ दुधाटे, सचिन भदर्गे, गजानन क्षीरसागर, हनुमान ढगे, तसेच सायबर युनिटमधील गणेश कौटकर यांच्या संयुक्त प्रयत्नातून पार पडली.

---

# वरोरा तालुक्यात अवैध रेती तस्करीचा धुमाकूळ, महसूल विभाग गप्प का?

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यात सध्या अवैध रेती तस्करी जोरात सुरु आहे. भद्रावती महसूल विभाग कारवाई करत असला तरी वरोरा आणि शेगाव महसूल विभाग या प्रकरणात संशयाच्या भोवऱ्यात सापडलेले आहेत. शेगाव पोलिस स्टेशन हद्दीतील शेगाव, अर्जुनी, आष्टा, पारोधी, किन्हाळा, कोकेवाडा, धानोली घाट आणि वरोरा पोलिस स्टेशन हद्दीतील अनेक ठिकाणी अवैधपणे रेती उत्खनन सुरु आहे. मात्र महसूल विभागाकडून यावर कोणतीही ठोस कारवाई होत नाही. त्यामुळे रेती तस्करांची हिम्मत गगनाला भिडलेली आहे.




सूत्रांच्या माहितीनुसार,लोकांच्या मनात असा संशय निर्माण झाला आहे की, महसूल विभागाच्या काही अधिकाऱ्यांची संलिप्तता या तस्करीत असू शकते. दिवसरात्र रेती उपसा करणारे तस्कर इतके निर्भय झाले आहेत की, तुम्ही जे कराल ते करा, आमचे कोणी वाकडं करू शकत नाही अशी धमकी देऊन ते खुलेआम आपली ताकद दाखवत आहेत.यामुळे वरोरा तालुक्यांतील महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या कार्यावर आणि त्यांच्या संगनमतावर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले आहे. जर काही महसूल अधिकारी तस्करांसोबत हातमिळवणी करून असतील, तर त्यांच्यावर कारवाई होणार का? हा एक महत्त्वाचा प्रश्न जनतेसमोर उभा आहे. जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलिस अधीक्षक यांना आता वरोरा आणि शेगाव पोलिस स्टेशन हद्दीतील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. जनतेची नजर आता या प्रकरणावर लागलेली आहे.

---




### सुटीची सुचना

१ मे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या निमित्ताने दै.सह्याद्रीचा राखणदार कार्यालयास सुट्टी असणार आहे. यामुळे दि.२ मेचा अंक प्रकाशित होणार नाही याची वाचक, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

---

# वैजापूरमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ

## घरफोडी करत स्कूटी, टीव्ही लंपास

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर शहरातील शांतीनगर भागात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी केली. २७ एप्रिल ते २९ एप्रिल दरम्यान घडलेल्या या घटनेत चोरट्यांनी घराचे लॉक तोडून टीव्ही आणि घरासमोर उभी असलेली टीव्हिएस कंपनीची स्कूटी चोरीला घेतली. याप्रकरणी मंगळवारी वैजापूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी छाया दीपक व्हसाळे (वय ३०), शांतीनगर, स्टेशन रोड, नायरा पेट्रोल पंपाच्या मागे, या आपल्या दोन्ही मुलांसोबत २७ एप्रिल रोजी त्यांच्या आजारी असलेल्या आईला भेटण्यासाठी छत्रपती संभाजीनगर गेल्या होत्या. २९ एप्रिल रोजी शेजाऱ्यांकडून त्यांना फोन आला आणि त्यांना सांगण्यात आले की, घरासमोर उभी असलेली स्कूटी गायब आहे. तसेच, घराचे गेट बाहेर ओढलेले आहे.

त्यांनी घरी परत आल्यावर तपास केला आणि त्यांना घराचे दरवाजाचे लॉक तुटलेले दिसले. त्याचवेळी त्यांचा टीव्ही घरातून गायब होता, तसेच घरासमोर उभी असलेली स्कूटी क्रमांक चक २० ऋ्च् ६१८३ गायब होती. फिर्यादी यांनी शेजाऱ्यांशी संपर्क साधला आणि समजले



की, त्यांच्याच घराजवळ असलेल्या पाणीपुरी विक्रेत्याच्या घरात देखील चोरी झाली आहे. यावरून हे स्पष्ट झाले की, एकाच रात्री विविध ठिकाणी चोरीच्या घटना घडल्या आहेत.चोरीची माहिती मिळताच छाया व्हसाळे यांनी वैजापूर पोलिस स्टेशन गाठून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन तपास सुरू केला असून, या प्रकरणाचा अधिक तपास करण्यात येत आहे. चोरीच्या वस्तूंचा मागोवा घेतला जात आहे आणि पोलिस चोरट्यांचा शोध घेत आहेत.शहरात अशा प्रकारच्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसत आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांकडून चोरीची तपासणी चालू असून, आगामी काळात अशा घटना थांबवण्यासाठी उपाययोजना घेण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

---

# पिशोर येथे वृद्धाची आत्महत्या

**पिशोर । जावेद शेख**

पिशोर - येथील शफेपूर भागात एका ८० वर्षीय वृद्धाने विषारी



औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी दुपारी साडे बारा वाजेच्या सुमारास उघडकीस आली. मयताचे नाव नारायण आनंदा मोकासे आहे.

घटनेच्या तपासानुसार, नारायण मोकासे यांनी सकाळी आपल्या राहत्या घरात काही विषारी औषध प्राशन केले. त्यानंतर त्यांना चक्राकार झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांनी तात्काळ छत्रपती संभाजीनगर घाटी येथील रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान नारायण यांची प्राणज्योत मालवली.पिशोर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# चंद्रपुरात केंद्र सरकारच्या जातिनिहाय जनगणनेच्या निर्णयाचे स्वागत व जल्लोष

## विदर्भवादी ओबीसी नेते डॉ.अशोक जीवतोडे यांनी केले केंद्र सरकारचे अभिनंदन

## केंद्र सरकार जातीनिहाय जनगणना करणार, कॅबिनेट बैठकीत मोठा निर्णय

## ओबीसी विद्यार्थ्यांनी व राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी साजरा केला जल्लोष

**चंद्रपुर । प्रतिनिधी**

केंद्र सरकार जातीनिहाय जनगणना करणार आहे. याबाबत केंद्राने कॅबिनेट बैठकीत हा मोठा निर्णय घेतला आहे. घोषणा होताच काही वेळातच चंद्रपूर शहरात विद्यार्थी व राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी आज (दि.३० एप्रिल) ला एकच जल्लोष केला व केंद्र सरकारच्या निर्णयाचे स्वागत करीत अभिनंदन केले.केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार जातीनिहाय जनगणना करणार आहे. आज (दि.३० एप्रिल) ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी झालेल्या कॅबिनेट बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयाची माहिती दिली आहे. स्वतंत्र भारतात १९५१ साली पहिली जनगणना करण्यात आली होती. तर २०११ साली यूपीए सरकारच्या काळात अखेरची जनगणना झाली होती. मागील अनेक वर्षांपासून राष्ट्रीय ओबीसी महासंघ व देशातील इतर ओबीसी संघटनाच्या माध्यमातून जातिनिहाय जनगणना करण्यात यावी ही आग्रही मागणी होती. अखेर केंद्र सरकारने आता जातीनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली आहे. या घोषणेनंतर चंद्रपूर शहर व जिल्ह्यात विदर्भवादी ओबीसी नेते, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय समन्वयक तथा भारतीय जनता पक्षाच्या ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अशोक जीवतोडे यांच्या नेतृत्वात एकच जल्लोष करण्यात आला. यावेळी फटाक्यांची आतषबाजी करुन जल्लोषात केंद्र सरकारचे स्वागत केले.



कॅबिनेट बैठकीतील या महत्त्वाच्या निर्णयाची माहिती देताना मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, सामाजिक रचनेचा विचार करून आणि संविधानातील स्पष्ट तरतुदी लक्षात घेऊन मोदी सरकारने हा निर्णय घेतला आहे. आज, दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी केंद्र सरकारने पुढील जनगणनेत जातीनिहाय जनगणना समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. हे सरकार आपल्या समाजाच्या व देशाच्या मूल्यांप्रती व हितसंबंधांप्रती कटीबद्ध आहे. हा निर्णय देखील सर्व समाजघटकांच्या कल्याणासाठी घेण्यात आला आहे.या निर्णयाचा ओबीसी सह इतर सर्वच प्रवर्गातील जातींना फायदा होणार आहे. जातनिहाय जनगणना झाल्यास संविधानाने दिलेल्या अधिकार व हक्कांचे खऱ्या अर्थाने प्रत्येक जातीपर्यंत लाभ पोहोचतील, असे डॉ. अशोक जीवतोडे यावेळी म्हणाले.

# छत्रपती क्रीडा मंडळाचा वर्धापन दिन स्नेहमीलनाने थाटात साजरा

## तहसीलदार राजेश भांडारकर यांची प्रमुख उपस्थिती

**भद्रावती । प्रतिनिधी**

भद्रावती तालुक्यात एक कबड्डी मंडळ म्हणून नावाजलेले छत्रपती क्रीडा मंडळ गेल्या काही वर्षांपासून सातत्याने ग्रामीण स्तरावरून राष्ट्रीय पातळीपर्यंत उत्कृष्ट खेळाडू घडवित आहे. अशा लौकिकप्राप्त मंडळाचा वर्धापन दिन आणि स्नेहमीलन सोहळा नुकताच भव्यदिव्य स्वरूपात स्थानिक लोकमान्य विद्यालयाच्या प्रांगणात संपन्न झाला.



या मंडळाच्या सरावासाठी लोकसेवा मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत गुंडावार यांनी मौल्यवान सहकार्य करीत लोकमान्य विद्यालयाचे मैदान उपलब्ध करून दिले. विद्यालयाचे प्राचार्य सचिन सरपटवार व उपप्राचार्य रूपचंद धारणे यांचे सततचे मार्गदर्शन मंडळाच्या खेळाडूंना लाभत आहे. वर्धापन दिन आणि स्नेहमीलन सोहळ्याचा मुख्य उद्देश खेळाडू, प्रशिक्षक आणि क्रीडाप्रेमींना एकत्र आणणे, मंडळाच्या कार्याची माहिती देणे व खेळाडूंना प्रोत्साहित करणे हा होता. मंडळाचे अनेक खेळाडू आज शासकीय सेवेत कार्यरत असून त्यांच्या कार्यामुळे मंडळाची पताका उंचावली आहे.या कार्यक्रमास भद्रावतीचे तहसीलदार राजेश भांडारकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे सोहळ्याचा उत्साह द्विगुणित झाला. तहसीलदार यांच्याहस्ते मैदानात असलेल्या मंदिरातील भगवान हनुमानजीची आरती करण्यात आली. सिंदूर, फुल व प्रसाद अर्पण करून महाप्रसादाचे सुरवात करण्यात आले.यावेळी कबड्डी मंडळाचे अध्यक्ष अफजल भाई, सहसचिव शंकर बोरघरे, कोषाध्यक्ष जितेंद्र माहूरे, कार्यकारी सदस्य शाम चटपल्लीवार, तसेच जेष्ठ खेळाडू सुरज पाशी, सागर मोरे, राष्ट्रीय खेळाडू धिरज पाशी, अजय पाडवार, व द्रोणाचार्य खो-खो मंडळाचे सचिव संतोष निंबाळकर यांच्यासह अनेक खेळाडू व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंडळाचे कार्य हे सामाजिक ऐक्य, शारीरिक सक्षमता आणि क्रीडा संस्कृतीचा विकास यासाठी प्रेरणादायी ठरत आहे. यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी मंडळाचे कौतुक केले. भविष्यात राज्य व राष्ट्रीय स्तरावर खेळाडूंनी यश मिळवावे, अशी अपेक्षा सर्वांनी व्यक्त केली. छत्रपती क्रीडा मंडळाचे हे कार्य ग्रामीण युवकांना दिशा देणारे ठरत असून, अशाच प्रकारच्या सामाजिक व क्रीडा उपक्रमांनी युवकांना प्रेरणा मिळावी, अशी भावना सर्व स्तरातून व्यक्त करण्यात आली.

# वरोरा तालुका माळी समाज सेवा मंडळाच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात संपन्न

## जयंती महोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक उपक्रम



**वरोरा । प्रतिनिधी**

क्रांतीज्योती महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती निमित्त वरोरा तालुका माळी समाज सेवा मंडळ व सुश्रुत हॉस्पिटल वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात ईसीजी , ब्लड शुगर, ब्लड प्रेशर आदी विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या.

शिबिरात डॉ. पवन डोंगरे व डॉ. मंजुषा डोंगरे यांनी ४२ पुरुष आणि ३५ महिलांची वैद्यकीय तपासणी केली. नागरिकांनी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी माळी समाजातील केशवराव लोथे, राजू डोंगरे, विलास सपाटे, विनोद ठाकूरकर, सूरज बोबडे, सतीश राजनकर, प्रमोद डोंगरे, गोपाळराव निंबाळकर, पुंजाराम डोंगरे, रमेश लांजेवार यांचे विशेष सहकार्य लाभले. सुश्रुत हॉस्पिटलच्या संपूर्ण टीमनेही शिबिराच्या आयोजनासाठी परिश्रम घेतले.समाजसेवेच्या माध्यमातून आरोग्य विषयक जनजागृती घडवून आणणारा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

# पिशोर येथे ट्रॅक्टर व रिक्षाची समोरासमोर धडक; ६५ वर्षीय व्यक्तीचा जागीच मृत्यू

**पिशोर । जावेद शेख**

कन्नड तालुक्यातील पिशोर गावाजवळील सिल्लोड रस्त्यावर जाधव ढाब्याजवळ ट्रॅक्टर व तीनचाकी रिक्षा यांच्यात समोरासमोर धडक होऊन सांडू दगडू खडके (वय ६५, रा. पिशोर) यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातामुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे.



खडके हे नेहमीप्रमाणे पिशोर येथून छत्रपती संभाजीनगर येथे भाजीपाला खरेदीसाठी गेले होते. खरेदी केलेला माल घेऊन परत येत असताना राशाची टेकळी परिसरात जाधव ढाब्याजवळ त्यांच्या रिक्षाला ट्रॅक्टरने जोरदार धडक दिली. धडकेनंतर त्यांचा जागीच मृत्यू झाला.

त्यांना तत्काळ पिशोर येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले असता, डॉक्टरांनी मृत घोषित केले. शवविच्छेदनानंतर अंत्यसंस्कार करण्यात आले.या घटनेची नोंद पिशोर पोलिस ठाण्यात झाली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिवाजी नागवे यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार वसंत पाटील करत आहेत.

# दहशतवादी हल्ले अजून किती दिवस?

२२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप भारतीयांनी आपला जीव गमावला. या घटनेनंतर संपूर्ण देशात संतापाचा कल्लोळ उसळला आहे. अशा प्रसंगी पाकिस्तानने तटस्थ आणि पारदर्शक चौकशीसाठी तयारी दर्शवली आहे, पण या ऑफरकडे भारताने पुरेशा शंकेनं पाहायला हवं. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी काकुल येथील पाकिस्तान मिलिटरी अकादमीत बोलताना, भारताने सतत आरोप करणे थांबवावे, असं सुचवलं. त्यांनी पुन्हा एकदा तटस्थ चौकशीत सहभागी होण्याची तयारी दर्शवली, पण त्यांच्या या विधानामागे हेतू किती स्वच्छ आहेत, यावर शंका आहे. दरम्यान पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसीन नक्वी यांनी लाहोरमधील पत्रकार परिषदेत जाफर एक्सप्रेस ट्रेन अपहरण प्रकरणातही भारताच्या कथित सहभागाची चौकशी करावी, अशी मागणी केली.पण वास्तव हे आहे की, पहलगाममधील हल्ल्यानंतर भारताने निर्णायक राजनैतिक भूमिका घेतली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीरपणे सांगितले आहे की, हल्ल्याला जबाबदार असलेल्या दहशतवाद्यांना कुठल्याही किंमतीवर माफ केले जाणार नाही. ‘मन की बात’मध्येही त्यांनी या घटनेविषयी तीव्र भावना व्यक्त केल्या आहे.पाकिस्तानच्या तटस्थ चौकशीच्या ऑफरवर विश्वास ठेवणं म्हणजे इतिहास विसरणं. मुंबई हल्ला, उरी, पुलवामा... प्रत्येक वेळेस पाकिस्तानने हात झटकले आणि स्वतःला निर्दोष ठरवलं. पण पुरावे आणि कालांतराने उघड झालेल्या गोष्टींनी त्यांचा खरा चेहरा समोर आणला आहे.ज्यांनी आपल्या जवानांचा, नागरिकांचा बळी घेतला, त्या कटकारस्थानामागील माणसांना शिक्षा होणे ही केवळ गरजच नव्हे, तर कर्तव्य आहे. भारताने आता भ्रम सोडून कठोर कृती करावी आणि पीडित कुटुंबांना जलद आणि ठोस न्याय मिळवून द्यावा.दहशतवादाच्या प्रत्येक हल्ल्यानंतर आपण दुःख व्यक्त करत राहायचं की निर्णायक उत्तर द्यायचं ?हा प्रश्न आता प्रत्येक भारतीयाच्या मनात आहे.

**–विलास खैरनार,नाशिक**
**मो. ९६७३६७५९१२**

# महिलांच्या सक्षमीकरणासाठी बसवेश्वर महाराजांचे कार्य आजही प्रेरणादायक–तहसीलदार उद्धव नाईक

## अक्षय तृतीया व बसवेश्वर जयंतीनिमित्त पाथर्डी तहसील कार्यालयात शासकीय मानवंदना

**अहिल्यानगर । वजीर शेख**

बाराव्या शतकात समाजात असलेल्या जातीभेद, वर्णभेद, कर्मकांड व स्त्री-पुरुष असमानतेला छेद देत महात्मा बसवेश्वर महाराजांनी स्त्री-पुरुष समानतेचा मूलमंत्र दिला. त्यांनी केवळ विचार मांडले नाहीत, तर आपल्या कृतीतून त्याची अंमलबजावणी केली. त्यांच्या कार्यामुळे आज देशात सर्वच स्तरावर महिलांना समानतेची वागणूक मिळते, असे प्रतिपादन पाथर्डीचे तहसीलदार उद्धव नाईक यांनी केले. अक्षय तृतीया आणि बसवेश्वर महाराज जयंतीनिमित्त पाथर्डी तहसील कार्यालयात आयोजित कार्यक्रमात शासकीय मानवंदना देण्यात आली. या वेळी नाईक बोलत होते. कार्यक्रमाला लिंगायत समाजाचे ज्येष्ठ नेते प्रभाकर अण्णा इजारे, गजानन तारापुरे, संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष संतोष जिरेसाळ, महिला आघाडी तालुकाध्यक्ष रेणुका फुलशेटे, दत्तात्रय टेंभुरकर, संजीव कुमार चेलवे, समाजप्रबोधनकार हुमायूनभाई आतार, अभिजित गुजर, सचिन फुटाणे, शुभम जिरेसाळ, महसूल सहायक दीपक मिरपगार, रविकुमार सानप आदी उपस्थित होते.

तहसीलदार नाईक पुढे म्हणाले, बाराव्या शतकात अठरापगड जातींना समाजात हीन दर्जाची वागणूक दिली जात होती. अशा काळात बसवेश्वर महाराजांनी लिंगायत पंथाच्या माध्यमातून या समाज घटकांना ईश्वरभक्तीचा सोपा मार्ग दाखवला. सर्व जाती, पंथ, धर्म यांना एकत्र आणत त्यांनी त्यांना मुख्य प्रवाहात आणले. ही सामाजिक क्रांतीच होती.

दरम्यान, नगर परिषद कार्यालयातही कार्यालय अधीक्षक अमोल मदने, भांडार विभाग प्रमुख अशोक डोमकावळे, अंबादास साठे यांच्या हस्ते बसवेश्वर महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून मानवंदना देण्यात आली.कार्यक्रमाच्या निमित्ताने पाथर्डी नगर परिषदेच्या नव्याने बांधल्या जाणाऱ्या इमारतीतील बहुउद्देशीय सभागृहास महात्मा बसवेश्वर महाराजांचे नाव देण्यात यावे, अशी आग्रही मागणी लिंगायत समाजबांधवांच्या वतीने करण्यात आली.

## बहुउद्देशीय सभागृहाला बसवेश्वर महाराजांचे नाव देण्याची मागणी



# श्री टागोर शिक्षण संस्थेचे गुणवत्ता संवर्धनामध्ये उत्तुंग यश

**सोलापूर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद पुणे व पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ यांच्या वतीने पिंपरी चिंचवड शहरातील शाळांसाठी गुणवत्ता संवर्धन अभियान राबवले गेले होते. या अभियानात अनेक शाळांनी सहभाग घेतला होता. यामध्ये टागोर शिक्षण संस्थेच्या श्री टागोर माध्यमिक विद्यालयाने पुणे व पिंपरी चिंचवड शहरात गुणवत्ता संवर्धन अभियानामध्ये जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळवला, तर पिंपरी चिंचवड तालुका गटातून प्रथम क्रमांक मिळवला.

पाचशे ते हजार पट संख्या असलेल्या गटात श्री स्वामी समर्थ विद्या मंदिराने पिंपरी चिंचवड विभागातून प्रथम क्रमांक मिळवला आहे. या उत्कृष्ट



कामगिरीबद्दल पुणे जिल्हा परिषद पुणेचे कर्तव्यदक्ष शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर आणि पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष नंदकुमार सागर, संभाजी पडवळ, सचिव प्रसाद गायकवाड आणि सुबोध गलांडे यांनी श्री टागोर शिक्षण संस्थेला पुरस्कार देऊन मानसन्मान केला.या कार्यक्रमात टागोर शिक्षण संस्थेच्या कार्याची प्रशंसा करण्यात आली. पुरस्कार स्वीकारताना संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार विठोबा लांडे यांचा देखील सत्कार करण्यात आला. नंदकुमार लांडे यांनी बोलताना सांगितले की, टागोर शिक्षण संस्थेच्या सर्व शिक्षकांनी झोकून दिलेले कार्य यामुळे पिंपरी चिंचवड शहरात या दोन्ही शाळांना पुरस्कार प्राप्त झाला आहे. शाळा गुणवत्ता म्हणजे विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण आणि एक चांगली शिकण्याची जागा देणे. यामध्ये चांगले शिक्षक, योग्य सुविधा आणि सकारात्मक वातावरण यांचा समावेश होतो. शाळेचा गुणवत्ता म्हणजे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देणे आणि त्यांना भविष्यासाठी तयार करणे.कार्यक्रमादरम्यान विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष काळे, हनुमंत आगे, उद्धव ढोले, मनीषा गुरव, पर्यवेक्षक शिवाजी गुरव आणि सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. या पुरस्काराने निश्चितच श्री टागोर शिक्षण संस्थेच्या दोन्ही शाळांची जबाबदारी वाढली आहे, असे मत संस्थेचे सचिव श्सुरेश फलके यांनी व्यक्त केले.या वेळी भोसरी विभागातून पिंपरी चिंचवड शहरात श्री टागोर शिक्षण संस्थेच्या सर्व स्तरातून कौतुकाचा मोठ्या प्रमाणात वर्षाव होत आहे.

# महाराष्ट्रदिनी चिमूर तालुकास्तरीय उत्कृष्ट कर्मचारी पुरस्काराचे वितरण

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर पंचायत समिती अंतर्गत शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांना उत्कृष्ट कर्मचारी पुरस्काराचे वितरण १ मे महाराष्ट्रदिनी पंचायत समितीच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी चिमूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी नितीन फुलझेले राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून गट शिक्षणाधिकारी रुपेश कांबळे उपस्थित राहणार आहेत.

शिक्षण क्षेत्रात आणि सामाजिक कार्यात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तालुक्यातील अर्चना डोंगरे, रामदास कामडी, विकास पचारे, सुरेश डांगे, शिल्पा ढाकूणकर, सुरेश राऊत, सविता झाडे, सैंद्रपाल शंभरकर, ताराचंद रामटेके, दयाराम श्रीरामे, शैलेश वाघधरे यांसारख्या शिक्षकांचा सन्मानचिन्ह,




सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात येणार आहे.या समारंभाचे आयोजन शिक्षण विस्तार अधिकारी तुळशीराम महल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

# झाप ग्रामपंचायतीमध्ये 'सरपंच आपल्या दारी' कार्यक्रमाचा शुभारंभ, लोकनियुक्त सरपंच एकनाथ दरोडा यांच्या हस्ते

**जव्हार । जितेंद्र मोरघा**

झाप ग्रामपंचायतीमध्ये 'सरपंच आपल्या दारी' कार्यक्रमाचा शुभारंभ हेदोली गावातून लोकनियुक्त सरपंच एकनाथ दरोडा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सरपंच एकनाथ दरोडा यांनी प्रत्येक गावातील घराघरात जाऊन लोकांशी संवाद साधला. त्यांनी तेथील विकास कामांसंदर्भात चर्चा केली, घरकुल योजनेची पाहणी केली, जल जीवन योजनेचे देखरेख केली, तसेच प्रधानमंत्री घरकुल योजनेचे सर्वेक्षण केले. या उपक्रमात त्यांनी नवीन जॉब कार्ड, रेशन कार्ड, घरपट्टी, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, तसेच गावातील गल्लीबोळात रस्ते बांधण्यासंदर्भात देखरेख केली. याशिवाय



संजय गांधी निराधार योजनेचे नवीन लाभार्थी शोधण्यासह, पेंशन प्रकरणे न भरलेल्या लोकांचा सर्वे केला. 'लाडकी बहीण' लाभार्थींच्या बाबतीतही माहिती घेऊन त्यांचा सर्वेक्षण केला.

वैयक्तिक योजनांसंदर्भात गावकऱ्यांना माहिती देताना, १०वी आणि १२वी परीक्षेतील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन केले, आणि जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी ग्रामपंचायतीने मदतीची ग्वाही दिली.कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. यावेळी लोकनियुक्त सरपंच एकनाथ दरोडा यांनी मार्गदर्शन करत सांगितले की, प्रत्येक दोन महिन्यांत 'सरपंच आपल्या दारी' उपक्रम राबविला जाईल. जनतेकडून आलेल्या समस्यांचे निवारण करण्यासाठी प्रयत्न केले जातील. ग्रामपंचायतीत जनतेची अडचणी सोडवण्यासाठी जनता दरबार भरवला जाईल, ज्यामध्ये रेशन कार्ड, जातीचे दाखले, उत्पन्न दाखले, जॉब कार्ड, संजय गांधी निराधार योजनेचे फॉर्म उपलब्ध असतील.या वेळी ग्रामपंचायत अधिकारी अमोल भोये, ग्रामपंचायत सदस्य महेंद्र गवारी, विलास बागूल, रोजगार सेवक युवराज गवारी, आणि ग्रामपंचायत शिपाई काशिनाथ तेलवडे उपस्थित होते.

## करमाळा पाठबंधारे विभाग रामभरोशावर

# ५२ पदांपैकी केवळ १० कर्मचारी कार्यरत, जेई एकही नाही

**सोलापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या पाठबंधारे विभागाच्या करमाळा कार्यालयात अक्षरशः रामभरोशावर कारभार सुरू आहे. या विभागाचे उपअभियंता संजय अवताडे वयोमानानुसार नुकतेच सेवानिवृत्त झाले असून त्यांच्या जागी बाबासाहेब नावाचे अधिकारी रुजू झाले आहेत. मात्र, बाबासाहेब हे सोलापूर येथे वास्तव्यास असून तेथूनच करमाळा, अक्कलकोट, मैंदर्गी, होडगी आणि दहिगाव उपसा योजनेचा चार्ज पाहत आहेत.

या कार्यालयातील सर्वात गंभीर बाब म्हणजे एकही ज्युनिअर इंजिनिअर (गए) कार्यरत नाही. एकूण ५२ पदांपैकी केवळ १० कर्मचारीच सध्या सेवेत असून उर्वरित पदे रिक्त आहेत. त्यामुळे कामाचा भार वाढला असून, अनेक योजनांची कामे ठप्प असल्याचे चित्र आहे.

बांधाऱ्याच्या कामांसाठी लाईन आऊट देण्याची गरज असतानाही सरकारी माणूस उपलब्ध नाही असे उत्तर नागरिकांना मिळत आहे. कार्यालयात केवळ अतुल दाभाडे हे एकमेव कर्मचारी नियमितपणे उपस्थित असतात, त्यामुळे संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावरच पडली आहे. मांगी तलाव, दहिगाव योजना, कोळगाव पाणीप्रश्न यांसारख्या महत्त्वाच्या पाटबंधारे कामांवर साहेबांच्या अनुपस्थितीत निर्णय कसे घेतले जातात, यावर संशोधन करावे लागेल, अशी उपरोधिक प्रतिक्रिया स्थानिकांनी व्यक्त केली आहे.लोकप्रतिनिधींनी या गंभीर स्थितीकडे त्वरित लक्ष देऊन रिक्त पदांची भरती करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी आता जोर धरत आहे. आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय ही उक्ती या कार्यालयाच्या स्थितीला चपखल ठरत आहे.

# आ.राजेश बकाने यांचा भव्य नागरी सत्कार व लाडू तुला

**देवळी । प्रतिनिधी**

नांदुरा डफरे येथील महारुद्र पंचमुखी हनुमान जयंतीनिमित्त देवळी-पुलगाव विधानसभेचे लोकप्रिय आमदार राजेश बकाने यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी पारंपरिक पद्धतीने लाडू तुला करून त्यांचे अनोख्या प्रकारे स्वागत करण्यात आले.

आमदार बकाने यांचे गावात आगमन होताच उपसरपंच राजू इंगोले व ग्रामस्थांच्या वतीने फटाक्यांच्या आतषबाजीत त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. पंचमुखी हनुमान मंदिर परिसरात झालेल्या कार्यक्रमात एका परड्यात आमदार बकाने तर दुसऱ्या परड्यात लाडू ठेवून लाडू तुला करण्यात आली. कार्यक्रमात ग्रामस्थ व कार्यकर्त्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता.

यावेळी बोलताना आमदार बकाने यांनी



गावातील रस्त्यांसाठी आमदार निधीतून १० लाख रुपये व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आधुनिकीकरणासाठी ५० लाख रुपयांचा निधी जाहीर केला. गावकऱ्यांची सत्कार आणि लाडू तुला करण्याची इच्छा आज पूर्ण झाली असून या सन्मानाने मी भारावून गेलो आहे, असे भावनिक उद्गार त्यांनी काढले.कार्यक्रमाला भाजप वर्धा जिल्हाध्यक्ष सुनील गफाट, तृप्तीताई बकाने, जिल्हा उपाध्यक्ष अर्चनाताई वानखेडे, भाजप महामंत्री राहुल चोपडा, सरपंच अंबिका पोचपटे, ग्रामीण अध्यक्ष स्वप्नील खडसे, निलेश कसणारे, दशरथ भुजाडे, संतोष भोयर, भानुदास डफरे महाराज, वर्षाताई बोटफोले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात परिसरातील नागरिक व महिलांची लक्षणीय उपस्थिती पाहायला मिळाली.

## देशात जातनिहाय जनगणना होणार

# शेवटी सरकारला आली जाग निर्णयाचे स्वागतच-चोखारे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने अखेर देशात जातनिहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत या निर्णयाला मान्यता देण्यात आल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. या निर्णयाचं जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष व राष्ट्रीय ओबीसी महासंघ, महाराष्ट्र प्रदेशचे कार्याध्यक्ष दिनेश दादापाटील चोखारे यांनी स्वागत करत सरकारला 'उशिरा का होईना, पण योग्य पाऊल टाकलं' असा टोला लगावला आहे.



या मागणीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून काँग्रेस पक्ष आणि राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने आंदोलने, धरणे आणि विविध माध्यमांतून पाठपुरावा करण्यात येत होता. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देखील अनेकदा हा मुद्दा संसदेत आणि सभांमध्ये आक्रमकपणे मांडला होता. देशाच्या विकासात प्रत्येक घटकाचं योगदान काय आहे हे मोजण्यासाठी सर्वच समाजघटकांची अचूक आकडेवारी आवश्यक आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली होती.आम्ही सातत्याने ही मागणी करत होतो. जनगणना ही सामाजिक न्यायासाठी आणि योजनांच्या योग्य वाटपासाठी अत्यावश्यक आहे. आज शेवटी केंद्र सरकारला जाग आली असून आमच्या मागणीला मान्यता दिली गेली, हे लोकशाहीसाठी सकारात्मक पाऊल आहे, असे दिनेश चोखारे यांनी म्हटले आहे.

# वेव्हज् परिषदेच्या उद्घाटनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबईत

**मुंबई । प्रतिनिधी**

भारताच्या पहिल्या जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन (वेव्हज्) शिखर परिषदेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या १ मे रोजी मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे होणार आहे. या वेव्हज् परिषदेचे यजमानपद महाराष्ट्र शासन भूषवित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, सांस्कृतिक व माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती असणार आहे.

'कनेक्टिंग क्रिएटर्स, कनेक्टिंग कंट्रिज' या घोषवाक्याखाली होणाऱ्या या चार दिवसीय शिखर परिषदेत भारताला मीडिया, मनोरंजन आणि डिजिटल नवप्रवर्तनाचे जागतिक केंद्र म्हणून प्रदर्शित करण्यात येईल.

पंतप्रधान मोदी यांच्या सर्जनशीलता, तंत्रज्ञान आणि प्रतिभेच्या एकत्रीकरणाच्या दृष्टीकोनाशी सुसंगत असलेल्या या वेव्हज् २०२५ मध्ये चित्रपट, ओटीटी, गेमिंग, कॉमिक्स, डिजिटल मीडिया, कृत्रिम बुद्धिमत्ता, एव्हीजीसी- एक्सआर ब्रॉडकास्टिंग आणि नव्या तंत्रज्ञानाचा समावेश असेल. भारताच्या मीडिया आणि मनोरंजन क्षेत्रातील सामर्थ्याचे हे सर्वांगीण प्रदर्शन असेल. या उपक्रमाच्या माध्यमातून २०२९ पर्यंत ५० अब्ज डॉलर्सच्या बाजारपेठेचे दरवाजे उघडले जातील, असा अंदाज आहे.

या शिखर परिषदेत प्रथमच ग्लोबल मीडिया डायलॉग (ऋच्चऊ) चे आयोजन मुंबईत होणार आहे. यामध्ये २५ देशांचे मंत्री सहभागी होणार असून, भारताच्या जागतिक मीडिया क्षेत्रातील सहभागात हा एक ऐतिहासिक टप्पा ठरेल. वेव्हज्



बजार या जागतिक ई-मार्केटप्लेसमध्ये ६,१०० पेक्षा अधिक खरेदीदार, ५,२०० विक्रेते आणि २,१०० प्रकल्प सहभागी होणार आहेत, ज्यातून स्थानिक व जागतिक स्तरावर व्यवसाय आणि नेटवर्किंगच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत.

या परिषदेत प्रधानमंत्री क्रिप्टोस्पियरला भेट देऊन क्रिएट इन इंडिया उपक्रमांतर्गत निवड झालेल्या सर्जनशील कलाकारांशी संवाद साधणार आहेत. याशिवाय, ते भारत पॅव्हिलियन, महाराष्ट्र पॅव्हेलियनला देखील भेट देतील. या स्पर्धेसाठी एक लाखांहून अधिक नोंदणी झाली.

वेव्हज् २०२५ परिषदेमध्ये ९० हून अधिक देश, १०,००० प्रतिनिधी, १,००० कलाकार, ३०० हून अधिक कंपन्या आणि ३५० हून अधिक स्टार्टअप्स सहभागी होणार आहेत. शिखर संमेलनात ४२ मुख्य सत्रे, ३९ विशेष सत्रे आणि ३२ मास्टरक्लासेस आयोजित करण्यात येणार आहेत, ज्यामध्ये ब्रॉडकास्टिंग, इन्फोटेन्मेंट, एव्हीजीसी- एक्सआर चित्रपट आणि डिजिटल मीडिया यांसारख्या विविध क्षेत्रांचा समावेश असेल.

# प्रा.डॉ.महेश निकत यांना 'रत्नमोती स्टार गौरव पुरस्कार २०२५'; इचलकरंजी येथे होणार गौरव

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. प्रा. डॉ. महेश निकत यांना 'रत्नमोती स्टार गौरव राज्यस्तरीय पुरस्कार २०२५' जाहीर झाला आहे. निती आयोग (भारत सरकार) सल्गन वसुंधरा सामाजिक सेवाभावी संस्था, इचलकरंजी यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो.

ग्रामीण भागात उल्लेखनीय कार्य करून समाजघटकांना शिक्षण, सामाजिक जागृती आणि राष्ट्रनिर्मितीसाठी प्रेरणा देणाऱ्या प्रा. डॉ. निकत यांची निवड अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या या पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. संस्थेने पत्राद्वारे ही माहिती दिली असून देश बलशाली करण्यासाठी ग्रामीण पातळीवर त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे, असे गौरवोद्गार संस्थेच्या वतीने काढण्यात आले आहेत.

हा पुरस्कार इचलकरंजी येथे येत्या रविवार, ४ मे २०२५ रोजी सकाळी १० वाजता कुरुहिनशेट्टी भवन, सांगली नाका, महासत्ता चौक, निरामय हॉस्पिटल जवळ या ठिकाणी भव्य सोहळ्यात प्रदान करण्यात येणार आहे.या पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून आमदार डॉ. अशोकराव माने (बापू), डॉ. रवींद्र आरळी (संचालक, केंद्रीय अवजड उद्योग मंत्रालय, भारत सरकार), डॉ. निवेदिता माने (माजी खासदार), अशोकराव स्वामी (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महासंघ), जानकी भोईटे (सहायक कामगार आयुक्त), संजय शेटे (क्रीडा अधिकारी, इचलकरंजी मनपा), सदानंद सदाशिव (पोलीस उपअधीक्षक, भारतीय राखीव बटालियन), प्रशांत देवकर (डी.आय.जी., झेड प्लस सुरक्षा), रवींद्र माने (जिल्हा प्रमुख, शिवसेना कोल्हापूर), सचिन सुर्यवंशी (पोलीस निरीक्षक, शहापूर), सुरेश राठोड उपस्थित राहणार आहेत.या मान्यवरांच्या हस्ते प्रा. डॉ. महेश निकत यांचा सन्मान करण्यात येणार आहे. करमाळा तालुक्यातून विविध क्षेत्रांमध्ये झळाळत असलेला हा सन्मान सर्वांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.



# आता गावागावांतील तलावांचे होणार पुनरुज्जीवन, आ.किशोर जोरगेवार यांच्या हस्ते 'जलरथा'चे उद्घाटन

## शासकीय योजनेच्या प्रचार-प्रसारासाठी बीजेएसचा पुढाकार

चंद्रपूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' तसेच 'नाला खोलीकरण व रुंदीकरण' या योजनेचा गावागावात जाऊन प्रचार-प्रसार तसेच जनजागृतीसाठी करणार्या जलरथाचे किशोर जोरगेवार यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी सकल जैन समाज चे महासचिव संदीप बांठिया, भारतीय जैन संघटनेचे विदर्भ अध्यक्ष गौतम कोठारी , सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी, बिजेस जिल्हाध्यक्ष दिपेंद्र पारेख, जिल्हा सदस्य अनिकेत लूनावत, जिल्हा सचिव ऋषभ सकलेचा, सामाजिक कार्यकर्ते मोहित मोदी, तसेच भारतीय जैन संघटनेचे जिल्हा समन्वयक दीक्षांत बेले, प्रकाश देवतळे आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर योजनेद्वारे शासन गावागावांतील तलावांमधील गाळ काढून त्यांचे पुनरुज्जीवन करणार आहे. गाळ काढण्याचा संपूर्ण खर्च शासन करणार असून यासाठी पूर्ण राज्यात एकच दर निश्चित करण्यात आला आहे. ग्रामपंचायत किंवा पात्र स्वयंसेवी संस्थेला या कामासाठी अर्ज करून जिल्हा प्रशासनाने दिलेल्या पद्धतीनुसार काम करता येईल. तसेच तलावातून काढलेला गाळ शेतात टाकण्यासाठी अल्प व अत्यल्पभूधारक शेतकरी, विधवा, अपंग शेतकरी व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाकडून निश्चित दरानुसार अनुदानही दिले जाणार आहे. शासनाची ही योजना गावागावात पोहोचवणे, शेतकर्यांना गाळ घेऊन जाण्यासाठी प्रोत्साहन देणे, 'गाळमुक्त धरण' हे टेक्नॉलॉजी पोर्टल तयार करण्यासाठी भारतीय जैन संघटना (बीजेएस) आणि महाराष्ट्र शासन यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. त्या अनुषंगाने जलरथाची निर्मिती करण्यात आली असून तो जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये जाऊन या योजनेचा प्रचार-प्रसार करणार आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी सरपंचांनी आपल्या गावांचा मागणी अर्ज 'बीजेएस डिमांड ॲप'वर ऑनलाइन भरावा. बीजेएसने सर्व जिल्ह्यात नेमलेले प्रशिक्षित जिल्हा समन्वयक तसेच महाराष्ट्रातील बीजेएसचे हजारो कार्यकर्ते हे बीजेएसच्या माध्यमातून शेतकर्यांना, ग्रामपंचायतींना, तालुका-जिल्हा प्रशासनाला सहयोग करण्यासाठी सज्ज आहेत. या योजनेच्या जनजागृतीसाठी 'सुहाना स्पाइसेस' यांनी बीजेएसला सहकार्य केले आहे. योजनेची सर्व माहिती 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' म्हणजेच "www.shiwaar.com' या शासनाच्या पोर्टलवर दिली आहे. महाराष्ट्रातील जास्तीत जास्त गावांनी तलावातील गाळ काढण्यासाठी, नाला खोलीकरण-रुंदीकरणासाठी त्वरित अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावाअसे आव्हान बीजेएस च्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे



# वर्धा येथे हज यात्रेकरूंसाठी टीका करण व आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

देवळी । प्रतिनिधी

हज २०२५ यात्रेसाठी जिल्ह्यातील सहा तालुक्यांमधील संभाव्य यात्रेकरूंकरिता टीकाकरण व आरोग्य तपासणी शिबिर जिल्हा रुग्णालय वर्धा व हज कमिटी वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले. या शिबिरात ३० हज यात्रेकरू (पुरुष व महिला) यांची वैद्यकीय तपासणी व आवश्यक लसीकरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अशरफ अली शब्बीर अली होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सुमंत वाघ (C.S. वर्धा), डॉ. चकोर सर, -CS वानखेडे सर, डॉ. मारिया मॅडम, डॉ. पराग राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.



लसीकरण विभागातील अर्चना वैद्य, मिनल घेवाडे (सिस्टर), जैबून सिस्टर, शमीम पठाण, अकील (कक्ष सेवक), रुपाली गडपाले व एजाज मोहम्मद यांनी या शिबिरात महत्त्वपूर्ण सेवा दिली.या शिबिरासाठी हाजी रहामतुल्ला खान (वर्धा), हाजी जब्बार तवर (देवळी), डॉ. अनीस बेग (हिंगणघाट), हज ट्रेनर हाजी शोएब भाई, ॲड. इब्राहिम बक्ष, जुम्मन भाई, हाजी गफ्फार भाई, हाजी एजाज पटेल यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधितांचे योगदान महत्त्वाचे ठरले.

# जनतेच्या विश्वासाचा मान राखणारे नेतृत्व-आमदार राजेश बकाणे

देवळी । प्रतिनिधी

देवळी-पुलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश बकाणे हे आपल्या सक्रिय, पारदर्शक व विकासाभिमुख कार्यशैलीमुळे मतदारसंघात लोकप्रिय ठरले आहेत. रस्ते, आरोग्य, पाणीपुरवठा, शिक्षण अशा विविध क्षेत्रांत त्यांनी सुरु केलेली कामे जनतेत विश्वास निर्माण करणारी ठरत आहेत.

अलीकडेच एडीबी अंतर्गत मंजूर झालेल्या ३५२ कोटींच्या रस्ते प्रकल्पाचा शुभारंभ देवळी ते दहेगाव मार्गावर झाला. या कामाची स्वतः पाहणी करून पावसाळ्यापूर्वी सिमेंटीकरण पूर्ण करण्याच्या सूचना आमदार बकाणे यांनी दिल्या. रस्त्याचा उपयोग विद्यार्थ्यांपासून शेतकऱ्यांपर्यंत सर्वसामान्य



नागरिक करतात, हे लक्षात घेऊन त्यांनी कामाच्या दर्जावर व वेळेत पूर्णतेवर भर दिला.तसेच, नांदुरा डफरे येथील पंचमुखी हनुमान जयंतीनिमित्त झालेल्या नागरी सत्कार व लाडू तुला कार्यक्रमात त्यांनी गावातील रस्त्यांसाठी १० लाख रुपये व प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ५० लाख रुपयांचा निधी जाहीर करत आपली जनतेप्रती बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली.त्यांच्या कार्यपद्धतीत ग्रामीण भागातील गरजांवर भर, जनतेशी थेट संवाद आणि तत्पर निर्णयक्षमता ही ठळक वैशिष्ट्ये आहेत. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी ते सतत प्रयत्नशील असून, विकास हा हक्क असून तो प्रत्येक गावापर्यंत पोहोचवणे हे माझे कर्तव्य आहे, असे ते वेळोवेळी सांगतात.

# भारत विद्यालयात महात्मा बसवेश्वर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी



हिंगणघाट । प्रतिनिधी

भारत विद्यालय, हिंगणघाट येथे बुधवार, दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी महात्मा बसवेश्वर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त स्मरण व अभिवादन कार्यक्रम साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात महात्मा बसवेश्वर व तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली. या प्रसंगी मुख्याध्यापक हरीश भट्टड, उपमुख्याध्यापक किशोर चवरे, पर्यवेक्षिका निलाक्षीताई बुरीले, कु. मनिषाताई कोंडावार, शिल्पाताई चौधरी, अर्चनाताई सुरपाम, मिलिंद सावरकर, संदीप चांभारे, बोरकर व कपूर आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


कार्यक्रमाची सांगता राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रार्थनेने करण्यात आली. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना सामाजिक समता, सेवा, आणि अध्यात्मिक मूल्यांची प्रेरणा देणाऱ्या या दोन थोर विभूतींचे कार्य व विचार समजावून सांगण्यात आले.

## तांबा विजयगोपाल रोडची दयनीय अवस्था

# गावकऱ्यांचा संताप, प्रशासना कडे जलद दुरुस्तीची मागणी

तांबा । प्रतिनिधी

तांबा गावातून विजयगोपालकडे जाणारा मुख्य रस्ता सध्या खड्ड्यांनी भरलेला असून वाहनधारकांना अत्यंत त्रासदायक अनुभवांना सामोरे जावे लागत आहे. रस्त्याची अवस्था इतकी बिकट आहे की दुचाकी चालवण्याचीही इच्छा होत नाही, अशी भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली.या रस्त्याचा वापर रोज शेकडो नागरिक, विद्यार्थी व शेतकरी करत असून, सततच्या खड्ड्यांमुळे अपघाताचे प्रमाणही वाढत आहे. या पार्श्वभूमीवर गावकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असून, प्रशासनाने त्वरित लक्ष घालावे, अशी एकमुखी मागणी होत आहे.



या संदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) तांबा शाखा अध्यक्ष प्रमोद मडावी यांनीही जोरदार भूमिका घेत रस्ता तातडीने दुरुस्त करण्याची प्रशासनाकडे लिखित मागणी केली आहे. रोजचा प्रवास जीव मुठीत धरून करावा लागतो. ग्रामस्थांची ही वेदना दुर्लक्षित होऊ नये, असे प्रमोद मडावी यांनी स्पष्टपणे सांगितले.गावकऱ्यांच्या आरोग्य, सुरक्षेसोबतच विद्यार्थ्यांच्या शिक्षणालाही याचा फटका बसत असून, प्रशासनाने हा प्रश्न गांभीर्याने घेऊन रस्ता तातडीने दुरुस्त करावा, ही नम्र पण ठाम मागणी सर्व गावकऱ्यांनी केली आहे.

## शिक्षण विभागाचा आढावा, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवा

# जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविण्याचा संकल्प करा-पालकमंत्री डॉ.उईके

चंद्रपूर । प्रतिनिधी

विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. स्पर्धेच्या या युगात आपला विद्यार्थी कसा समोर जाईल, याचा गांभिर्याने विचार करून शिक्षकांनी अध्यापनाचे कार्य करावे. आजच्या युगात इंग्रजी शाळांचे प्रस्त वाढले असतांना, जिल्हा परिषदेच्या शाळेतसुध्दा विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण आणि उज्वल भविष्य मिळू शकते, असा विश्वास पालकांना देऊन विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविण्यासाठी सर्व शिक्षकांनी संकल्प करावा, अशा सूचना राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात शिक्षण विभागाचा आढावा घेताना ते बोलत होते. बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग, शिक्षणाधिकारी (प्राथ.) अश्विनी सोनवणे, राजेश पाताळे (माध्य.), अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे तसेच इतर अधिकारी उपस्थित होते.शाळेतील मूलभूत सुविधांसाठी शासन निधीची कमतरता पडू देणार नाही, असे सांगून पालकमंत्री डॉ. उईके म्हणाले, जि.प. शाळांतील विद्यार्थी पटसंख्या का कमी होत आहे, याची कारणमिमांसा होणे आवश्यक आहे. या कारणांचा शोध घेऊन शिक्षण विभागाने पाऊले टाकावीत. पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावे. त्यांच्या पाल्यांची गुणवत्ता आणि उज्वल भविष्य आम्ही घडू शकतो, असा विश्वास पालकांना द्या. शैक्षणिक क्षेत्रात असलेल्या 'असर' आणि 'नॅस' या उपक्रमांचा आधार घेऊन शिक्षण विभागाने प्रयत्न करावे.

शाळेमध्ये शिक्षकांची समिती तयार करून अध्यापनाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षकांची शिक्षकांकडूनच पडताळणी करा. नवनवीन संशोधन करा. आगामी शैक्षणिक क्षेत्रात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे अतिशय चांगल्या पद्धतीने



स्वागत होण्यासाठी आतापासून नियोजन करा. शैक्षणिक उपक्रमांतर्गत दर १५ दिवसांनी पालकांच्या उपस्थितीत दर्जेदार चावडी वाचन उपक्रम राबवा. ज्या शाळांमध्ये इंटरनेट कनेक्शन आणि विद्युत पुरवठा वारंवार खंडित होतो, त्यासाठी जिल्हा नियोजन समिती मधून निधी देण्यात येईल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेत येण्याजाण्याचा त्रास होऊ नये, यासाठी मानव विकास अंतर्गत बसेसचे योग्य नियोजन करा.गाव स्तरावरील शाळांना भेटी द्या : शिक्षण विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांनी गाव स्तरावरील शाळांमध्ये भेटी देऊन नियमितपणे आढावा घ्यावा. ज्या शाळांमध्ये सीसीटीव्ही लावण्यात आले आहे, ते खरंच सुरू आहेत का, शाळेतील तक्रार पेटींचा उपयोग होतो का, याची पडताळणी करावी. सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजनांची माहिती विद्यार्थ्यांच्या पालकांपर्यंत पोहोचवा, अशा सुचना पालकमंत्री डॉ. उईके यांनी दिल्या.

मानव विकास अंतर्गत ७४४५ विद्यार्थीनींना सायकलचे वाटप : चंद्रपूर जिल्ह्यात सर्व व्यवस्थापनाच्या एकूण २४६१ शाळा असून यापैकी १५४९ शाळा जिल्हा परिषदेच्या आहेत. जिल्ह्यात एकूण विद्यार्थी संख्या ३ लक्ष ६१ हजार ६८७ आहे. सखी सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षा समिती आणि तक्रार पेटी उपलब्ध असलेल्या शाळांची संख्या २४६१ आहे. ४७५ शाळांमध्ये सीसीटीव्ही लावण्यात आले असून जिल्हा परिषदेच्या ५४९ शाळांमध्ये सीसीटीव्ही उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच जिल्ह्यात अपार आयडीचे काम ८७ टक्के पूर्ण झाले आहे. मानव विकास अंतर्गत ग्रामीण भागातील ७४४५ मुलींना सायकलचे वाटप करण्यात आल्याची माहिती शिक्षण विभागाने बैठकीत दिली.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha  Rakhandar Daily Newspaper  Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .